महाराष्ट्र शासन
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,
बहिरट पाटील चौक, शिवाजी नगर, पुणे - ४११ ०१६

दूरध्वनी क्र. (०२०) २५६५६२३४/२५६५७१७६ Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in


**महत्वाचे /तात्काळ**

जा. क्र. :तंशिविकापु/कौशल्यविकास//२०२४-२५/ 2774

दिनांक : 11 JUL 2024

**परिपत्रक**

प्रति,
प्राचार्य,
या कार्यालयाच्या अधिनस्त शासकिय/अनुदानित/विना अनुदानित पदवी/पदविका संस्था

**विषय :** महाविद्यालयातील युवक-युवतींना रोजगारक्षम बनविण्यासाठी "आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र " स्थापन करणेबाबत..

**संदर्भ :** १.संचालनालयाचे पत्र क्र.DTEM-D१७०TEQP/७६/२०२४DESK१७, दि.२९/०४/२०२४
२.संचालनालयाचे पत्र क्र.१७/तंशिसं/ कौशल्यविकास /२०२४/१०९, दि.०१/०७/२०२४

उपरोक्त विषयाबाबतचे संचालनालयाचे पत्र पहावे, महाराष्ट्र शासनाने महाविद्यालयांमध्ये कौशल्य विकास केंद्र स्थापन करण्यासाठी "आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र " ही नाविन्यपूर्ण योजना सुरू केली आहे.सदरचे कौशल्य विकास केंद्र स्थापन करून १५ ते ४५ वयोगटातील युवक-युवतींना विविध ३७ क्षेत्रांमध्ये ( बँकिंग,माहिती तंत्रज्ञान बांधकाम, इलेक्टॉनिक्स इ.) कौशल्य प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगारक्षम बनवून अथवा स्वयंरोजगाराच्या संधी पुरविण्यांत येतात. केंद्र शासनामार्फत निश्चित केलेल्या Common cost Norms नुसार या कौशल्य विकास केंद्रांना विविध टप्प्यांमध्ये प्रती प्रशिक्षणार्थी सरासरी रू.९०००/- ते १५०००/- पर्यन्त प्रशिक्षण शुल्क अदा करण्यांत येते.

सदर विकास केंद्रांतर्गत National Skills Qualification Framework (NSQF) अन्वये स्थापित मानकांनुसार १८०० पेक्षा अधिक व्यावसायिक अभ्यासक्रमाचे संबंधित प्रशिक्षण संस्थामार्फत उमेदवारांना प्रशिक्षण देण्यांत येत असून सदर कौशल्य प्रशिक्षण NSQF प्रणालीशी निगडीत आहे.प्रशिक्षाणाअंती उमेदवाराचे मूल्यमापन (Assessment) आणि प्रमाणीकरण (Certification) हे केंद्रशासनाच्या National council for Bocational Education Training - NCVET, National Skill Development Corporation -- NSDC Sector Skill Councils (SSC) किंवा महाराष्ट्र राज्य कौशल्य व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळाकडील ( MSBSVET) मान्यताप्राप्त मूल्यमापन संस्थामार्फत ( Assessing Body) करण्यांत येते. सदर प्रमाणपत्र राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यताप्राप्त असून या अभ्यासक्रमामध्ये Vertical व Horizonal Moblity अंतर्भूत आहे.

राज्यातील नामांकित महाविद्यालयांमध्ये "आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र " स्थापन करण्याचा राज्य शासनाचा मनोदय आहे. याकरीता गुगल फॉर्म लिंक तयार करण्यांत आलेली असून त्याद्वारे सदरचे केंद्र स्थापन करण्यासाठी दिनांक १५ जुलै, २०२४ पर्यन्त अर्ज करावयाचा आहे. यासाठी गुगल फॉर्म मधील लिस्ट - B मध्ये नमूद असलेल्या Future Skill Job Roles चा प्राधान्याने विचार करावयाचा आहे

तरी https:/forms.gle/kUz1W7bFEFyq26bc7 या लिंक वरील गुगल फॉर्म मध्ये आवश्यक ती माहिती भरून सदर योजनेसाठी विहीत मुदतीत अर्ज करावेत व सदर योजनेचा लाभ घेण्यात यावा . सदर योजनेच्या अधिक माहितीसाठी श्री. विनय काटोलकर, कौशल्य अभियान अधिकारी -१ दूरध्वनी क्र. ७०६६६०३४१९ व ई - मेल smo 1a@mssds.in किंवा श्रीजन तायडे दूरध्वनी क्र ८४१२८२८१४४ व ई - मेल vpf:shrijan@gmail.com यांचेशी संपर्क साधावा

(डॉ.द.व्यं.जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत - १. प्रोग्रॅमर तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

१०E:\जाधव म.भा\M.B.Jadhav letter\परिपत्रक २०२४.docx